Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

४९/२०२३

**विषय - विद्यापीठाच्या विविध घटना व उपक्रमांसदर्भातची माहिती प्रसारमाध्यमांना/प्रतिनिधींना जनसंपर्क कार्यालयामार्फत देणेबाबत...**

**संदर्भ - १) परिपत्रक जा.क्र.आस्थापना/१४०२ दि. १३ एप्रिल, २००९**

**२) परिपत्रक जा.क्र.आस्थापना/३४२० दि. १६ सप्टेंबर, २०१६**

सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, अधिकारी, व प्रशासकीय सेवक यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या विविध घटना/उपक्रमासंदर्भातची माहिती परस्पर प्रसार माध्यमांना किंवा प्रतिनीधीनां देवू नये असे उपरोक्त परिपत्रकानूसार कळविण्यात आलेले आहे. परंतु याचे पालन होत नसल्याचे कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे. विद्यापीठाच्या विविध घटना/उपक्रमासंदर्भातची परस्पर दिलेली माहिती ही चूकीची, त्रुटी असलेली, ऐकीव, एकांगी स्वरुपाची किंवा अंतिम न झालेली माहिती ठरावीक प्रसार माध्यमांना/प्रतिनिधीना अनाधिकृतपणे दिली जाते. त्यामुळे विद्यापीठाच्या नावलौकीकास बाधा ठरते. सदरची बाब अत्यंत गंभीर आहे.

या अनुषंगाने सर्वांना कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या विविध घटना/उपक्रमासंदर्भातची माहिती ही अधिकृतपणे विद्यापीठातील जनसंपर्क कक्षामार्फतच देण्यात यावी. याची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी. अन्यथा संबधितावर सेवानियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल.

कुलसचिव
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

जा.क्र. आस्थापना/ 2115
दि. 16 DEC 2023

प्रति,

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक

२) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.

३) जनसंपर्क कक्ष - माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी

४) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.

- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी